वारकरी संप्रदायात वंजारी समाजातील संतांचे योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड मानव विज्ञान विद्याशाखेतंर्गत इतिहास या विषयातील पीएच.डी. पूर्व संशोधन आराखडा

संशोधक

युवराज भास्करराव मुंडे

एम.ए. (इतिहास) सेट

मार्गदर्शक

डॉ. विठ्ठल व्यं. घुले

प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय, परभरणी

संशोधन केंद्र

ज्ञानोपासक महाविद्‌यालय, परभणी

सप्टेंबर : २०२३

प्रस्तावना

समाजात असलेल्या अनिष्ट प्रथा, परंपरा, चाली-रीती, अंधश्रद्धा आणि स्पृश्य-अस्पृश्येतची भावना नष्ट करण्यासाठी संतांनी मानवतावादी दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून ओव्या, अभंग, भजन, कीर्तन अशा साधनाच्या माध्यमातून जनजागृती करण्याचे कार्य केले. संत स्वतः उदात्त आणि निस्वार्थपणे कार्य करीत असताना त्यांचे समाजाशी अखंडपणे नाते जोडलेले होते. जगाच्या उद्धारासाठीच त्यांनी पृथ्वीतलावर जन्म घेतलेला असावा. सामाजिक कार्य करीत असताना सामाजिक जीवनाशी एकरूप होऊन जनकल्याणाचा वसा आणि वारसा त्यांनी जपला. जगद्‌गुरू संत तुकारामांनी "बुडती हे जन न देखवे डोळा येतो कळवळा म्हणोनिया" म्हणजेच रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्पृश्य-अस्पृश्य अशा समाजविघातक चाली रीतींमध्ये बुडत असलेल्या समाजाला वाचविण्यासाठी सर्व संतांनी आपले आयुष्य वेचले. स्वतःशी आत्मसंवाद करून त्यातून त्यांनी उत्तरे शोधली. यासाठीच त्यांनी ओव्या, अभग याच बरोबर भजन-कीर्तनाच्या माध्यमातून "नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी।।" या भूमिकेतून सामाजिक उद्धाराचे कार्यही केले. हे कार्य करीत असताना संतांनी कोणत्याही फळाची अपेक्षा न बाळगता निखळ प्रयोजनातून सामाजिक कार्य केलेले आहे. सर्व संतांनी समाजजीवनामध्ये वावरत असताना कोणत्याही भौतिक सुखाला महत्त्व न देता उदात्त समाजोद्धारांचे कार्य डोळ्यासमोर ठेवून सामाजिक परिवर्तनाची मुहूर्तमेढ रोवली.

समाजव्यस्थेत वर्णव्यवस्थेने ज्या व्यक्तीचे अधिकार नाकारले, ज्यांची शूद्र वर्णामध्ये गणना केली त्यांच्या उद्धारासाठी समाजातील कर्मकांड, जप-तप, अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी संतांनी मोठे योगदान दिले. संतांना परंपरागत कर्मकांडातील व लौकिक व्यवहारातील अंधश्रद्धा नष्ट करावयाची होती. त्यासाठी लोकाभिमूख होऊन बहूजन समाजाच्या अंतरंगात व बाह्याचरणात नवचैतन्य निर्माण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

तसेच सामाजिक जीवनात मानवतावाद, समता, बंधुत्व या मानवी मूल्यांची जोपासना केली. त्यांच्या प्रत्येक कृती आणि उक्तीतून भेदभाव न करता भक्तीच्या मेळ्यात समानतेला अग्रगण्य स्थान दिलेले दिसून येते. संतांनी काळपरत्वे बदलत्या परिस्थितीचा आढावा घेऊन समाजोपयोगी नवीन मूल्यांची जोपसना केली. ती मूल्ये समाजात रूजविण्यासाठी ऐतिहासिक साहित्याची निर्मिती केली.

या संतपरंपरेमध्ये महाराष्ट्र आघाडीवर राहिलेला आहे. कारण महाराष्ट्राला संतांची जन्मभूमी व कर्मभूमी म्हणून ओळखले जाते. या संतभूमीमध्ये आध्य कवी मुकूंदराज, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम, संत गोरोबा काका, संत जगन्मित्र नागा, संत रामदास, संत चोखामेळा, सावता माळी, संत जनाबाई इत्यादींनी भारूड, अभंग, कीर्तन, भजन यांच्या माध्यमातून समाजातील अंधश्रध्दा, कर्मकांड, जातीव्यवस्था इत्यादींच्या विरोधात मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्याचे महान कार्य केले.

महाराष्ट्राच्या वारकरी संत परंपरेत वंजारी समाजाचेसुद्धा योगदान राहिले आहे. यामध्ये संत शेकुबादादा, संत भगवानबाबा, संत भीमसिंह महाराज, संत वामनभाऊ इत्यादीनी भजन, प्रवचन, कीर्तन आदी साधनाच्या माध्यमातून समाजात जनजागृती करून समाजाला योग्य दिशा दाखविण्याचे कार्य केले. याच वंजारी समाजातील संत परंपरेचा वारसा सध्या चालवित आहेत.

या संत मंडळीनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात भजन, प्रवचन आणि कीर्तनाच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रबोधनाचे कार्य केले. कीर्तनाच्या माध्यमातून या संतानी जातिभेद, धर्मभेद, अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, परंपरा अशा समाज विघातक समस्यांवर प्रहार केला. त्यासाठी त्यांनी महाराष्ट्रासह मध्यप्रदेश, तेलंगना, आंध्रप्रदेश आणि कर्नाटक या राज्यांमध्ये संत परंपरेच्या कार्याचा प्रचार व

प्रसार करताना समता, बंधुता, एकता आणि मानवता ही मूल्ये समाजात रूजविण्याचे कार्य केले.

एकंदरीत दिशाहीन झालेल्या समाजाला दिशा देण्यासाठी महाराष्ट्रातील वारकरी संत परंपरेप्रमाणे वंजारी समाजातील संत शेकुबादादा, संत भगवानबाबा, संत भीमसिंह महाराज, संत वामनभाऊ संताचे मोठे योगदान राहिले आहे,

विषय निवडीमागची भूमिका

संशोधनकार्यात विषय निवडण्याच्या भूमिकेला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. संशोधनाचे क्षेत्र कोणतेही यामध्ये कृषी, आरोग्य, सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, वैज्ञानिक, भौगोलिक, अवकाश, ऐतिहासिक इत्यादींमध्ये संशोधन भूमिका केंद्रस्थानी असते. संशोधन भूमिका निश्चित केल्याशिवाय संशोधनकार्य करणे अशक्य असते. संशोधनकार्यामध्ये संशोधन भूमिका ही प्रथम पायरी असते. त्यामुळे, संशोधकाला संशोधन करण्यासाठी सर्वप्रथम संशोधन भूमिका निश्चित करणे आवश्यक असते. त्याच अनुषंगाने इतिहासामध्ये गेल्या हजारो वर्षापासून राजा, महाराज्या, राणी यांच्या कार्य कर्तृत्वावर संशोधन होत राहिले आहे. परंतु यांना सहाय्य करणाऱ्या गावकुसाबाहेरील, बलुत्तेदार, अलुत्तेदार आणि भटके यांच्यावर संशोधन झाले नाही. त्यामुळे राजा, महाराजा, राणी आणि इतर प्रस्थापित जातीचा अपवाद वगळता इतर समाजाच्या ऐतिहासिक योगदानाची समाजाने दखल घेतलेली दिसून येत नाही. तसेच महाराष्ट्राच्या वारकरी संप्रदायातील संत परंपरेचा विचार करता अध्य कमी मुकूंदराज, संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम, संत गोरोबा काका, संत जगन्मित्र नागा, संत रामदास, संत चोखामेळा, सावता माळी, संत जनाबाई यांच्या कार्यावर भरपूर संशोधन झाले आहे. परंतु गावकुसाबाहेरील बलुत्तेदार, अलुत्तेदार आणि भटके समाजातील वारकरी परंपरेतील संतांचे ऐतिहासिक कार्यावर संशोधन झाले नाही. याच

दृष्टिकोनातून वारकरी संप्रदायातील संत परंपरेचा वारसा पुढे चालविण्यासाठी वंजारी समाजातील संत शेकुबादादा, संत भगवानबाबा, संत भीमसिंह महाराज, संत वामनभाऊ यांनी समाजातील अंधश्रद्धा, कर्मकांड, जातीव्यवस्था, स्पृश्य-अस्पृश्यता, उच्च-नीच इत्यादीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी अभंग, भजन, प्रवचन, कीर्तन आदी साधनांच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे महत्वाचे कार्य केले. या त्यांच्या कार्याचा सखोल अभ्यास करण्यासाठी **वारकरी संप्रदायात वंजारी समाजातील संतांचे योगदान : एक ऐतिहासिक अभ्यास** हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

प्रस्तुत संशोधनकार्य पूर्ण करण्यासाठी खालील संशोधानची उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत.

१. वंजारी समाजाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेणे.
२. वंजारी समाजातील सण उत्सव, गोत्र, कुळ, कुलदैवत, संस्कृती इत्यादी घटकांचा अभ्यास करणे.
३. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायातील संत परंपरेचा आढावा घेणे.
४. वारकरी संप्रदायातील राष्ट्रसंत भगवानबाबांच्या चरित्र व कर्तृत्वाचा अभ्यास करणे.
५. वंजारी समाजातील इतर संतांचे चरित्र व कर्तृत्वाचा अभ्यास करणे.
६. वंजारी समाजातील संतांच्या जाणीव जागृतीचा आढावा घेणे.
७. वारकरी संप्रदायातील वारीच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचा आढावा घेणे.

संशोधनाची गृहीतकृत्ये

प्रस्तुत संशोधनकार्य पूर्ण करण्यासाठी खालील संशोधानची गृहीतके निश्चित करण्यात आली आहेत.

१. वंजारी समाजाचे मूळ राजस्थानमधील चित्तोड गढ असून ते ४०० वर्षापूर्वी भटकंती करत महाराष्ट्रात आले. त्यांचा परंपरागत व्यवसाय सैनिक किंवा इतर प्रदेशांना रशद पुरविणे असाच होता.

२. वंजारी समाजातील सण उत्सव, संस्कृती हे हिंदू धर्माप्रमाणे सारखेच आहेत. वंजारी समाज लढवय्य असल्यामुळे ते माहूरच्या रेणुका दैवीला कुलदैवत मानतात. तसेच गोत्र, कुळ इत्यादी संदर्भात त्यांची स्वतंत्र ओळख असलेली दिसून येते.

३. वारकरी संत परंपरेने महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

४. वारकरी संप्रदायाची पताका खांद्यावर घेऊन राष्ट्रसंत भगवानबाबाने समाजात जाणीव जागृती करण्याचे महत्त्वाचे कार्य केले आहे.

५. राष्ट्रसंत भगवानबाबा प्रमाणे वंजारी समाजात वारकरी संप्रदायाचे कार्य पुढे नेण्यासासाठी संत शेकुबादादा, संत भीमसिंह महाराज, संत वामनभाऊ यांचेही महत्वपूर्ण योगदान आहे.

६. वारकरी संप्रदायातील संतांनी सुरू केलेली वारी अखंडपणे चालू असून समकालीन स्थितीमध्ये तीचे महत्व वाढताना दिसून येत आहे.

संशोधन विषयाचे महत्व

महाराष्ट्र ही जशी शूर वीरांची जन्मभूमी आहे तशीच ती संतांची सुद्धा आहे. या महाराष्ट्रामध्ये संत परंपरेत अनेक संत होऊन गेले आहेत. जसे की, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत गोरोबा काका, संत जगन्मित्र नागा, संत रामदास, संत चोखामेळा, सावता माळी, संत समर्थ रामदास स्वामी, रोहिदास, विसोबा खेचर, सोपानदेव, संत मुक्ताई, संत जनाबाई, संत बहिणाबाई इत्यादी संत आणि त्यांचे

कार्य सर्व महाराष्ट्राला परिचित आहे. परंतु वारकरी संप्रदायाची पताका खांद्यावर घेऊन संत परंपरेप्रमाणे वंजारी समाजातील संत शेकुबादादा, संत भगवानबाबा, संत भीमसिंह महाराज, संत वामनभाऊ इत्यादींचे ऐतिहासिक योदगान राहिले आहे. कारण संत परंपरेप्रमाणे वंजारी समाजातील संतांनी अंधश्रद्धा, कर्मकांड, जातीव्यवस्था, स्पृश्य-अस्पृश्येतेवर कडाडून हल्ला केला. तसेच फुले, शाहू आणि आंबेडकरांच्या शैक्षणिक विचारांची पेरणी करण्याचे काम केले. तसेच इतिहासामध्ये आता वंचितांच्या इतिहासाची व्याप्ती वाढलेली आहे. शोषित, वंचित, दुर्लक्षित अशांची इतिहासातील योगदान अधोरेखित करणे महत्त्वाचे आहे. इतिहासात धर्म, पंथ, संप्रदाय यास अनन्यसाधारण महत्त्व असल्याने त्यावर संशोधन होणे गरजेचे आहे. यापूर्वी असा विषय घेऊन इतिहासात संशोधन झालेले नाही. त्यामुळे हा विषय महत्त्वाचा आहे.

संशोधन पद्धती

संशोधनाचे प्रामुख्याने व्यावहारिक संशोधन, क्रियात्मक संशोधन आणि मूलभूत संशोधन असे तीन प्रकार पडतात. व्याहारिक संशोधनातून जे निष्कर्ष समोर येतात त्यांचा उपयोग समाजाचे कल्याण करण्यासाठी होत असतो. हे संशोधन प्रामुख्याने सामाजिक जीवनाच्या व्यवहाराशी संबंधित असते. क्रियात्मक संशोधन आणि व्यावहारिक संशोधन हे परस्पराशी पूरक आहे. क्रियात्मक संशोधनाचा मुख्य उद्देश वर्तमान परिस्थितीमध्ये सुधारणा करण्याचा असतो. उदा.वांशिक तणाव, गलिच्छ वस्ती सुधार, पूर्वग्रह, सामाजिक सुधारणा, प्रशासकीय व्यवस्थेतील परिवर्तन किंवा पक्षपद्धती यांच्याशी संबंधित असते. तर मूलभूत संशोधनात एखादी घटना, विचार किंवा समाजात उद्भवलेल्या समस्यांचे कारण शोधले जाते. या संशोधनात समस्येचे निदान करण्यासाठी कोणत्याही प्रकारच्या उपाय योजना केल्या जात नाहीत. या संशोधन पद्धतीला गुणात्मक संशोधन असे म्हटले जाते. मूलभूत संशोधन हे अमूर्त किंवा चल घटकांशी संबंधित असल्यामुळे

त्यांच्यामध्ये स्थलकालपरत्वे बदल होत असतात. त्यामुळे प्रस्तुत संशोधनाचा विषय व्यष्टी (Case) किंवा मूलभूत अध्ययनाशी संबंधित असल्यामुळे तौलनिक, ऐतिहासिक, वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक या संशोधन पद्धतींचा वेळप्रसंगी उपयोग करण्यात येईल.

संशोधनाची साधने

संशोधनामध्ये प्राथमिक व द्वितीय साधनांचा समावेश होतो. प्राथमिक साधनांमध्ये संत शेकुबादादा, संत भगवानबाबा, संत भीमसिंह महाराज, संत वामनभाऊ यांनी लिहिलेले ग्रंथ, लेख, अभंग इत्यादींतून माहिती संकलित करण्यात येणार आहे. तर द्वितीय साधनांमध्ये संत शेकुबादादा, संत भगवानबाबा, संत भीमसिंह महाराज, संत वामनभाऊ संत नामदेव महाराज शास्त्री यांच्याशी संबंधित विविध लेखक, विचारवंत यांचे ग्रंथ, मासिके, साप्ताहिक तसेच शासनाची विविध प्रकाशने, वेबसाईट याचाही आधार घेण्यात येणार आहे.

संशोधनाची मर्यादा

संशोधन कार्याला निश्चित स्वरूपाची दिशा किंवा मर्यादा असणे महत्त्त्वाचे आहे. कारण, संशोधनाला विशिष्ट मर्यादा नसेल तर संशोधन कार्य भरकटत असते. ज्याप्रमाणे अथांग समुद्रामध्ये एखद्या जहाजाचे होकायंत्र काम करत नसेल तर ते भरकटत असते. त्याचप्रमाणे संशोधनाला मर्यादा नसतील तर संशोधनसुद्धा दिशाहीन होत असते. त्यामुळे संशोधन कार्याला निश्चित आकार येण्यासाठी वारकरी संप्रदायात वंजारी समाजातील संत शेकुबादादा, संत भगवानबाबा, संत भीमसिंह महाराज, संत वामनभाऊ या संतांनी समाजात सामाजिक जाणीव जागृती करण्यासाठी दिलेल्या ऐतिहासिक योगदानाचा अभ्यास करण्याचे निश्चित केले आहे, ही या संशोधनाची मर्यादा आहे. असे असले तरी

अपवादात्मक परिस्थितीमध्ये संशोधनाच्या अनुषंगाने काही संदर्भ साहित्याचा उल्लेख येऊ शकतो.

संशोधन आराखडा

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणामध्ये विषयाची प्रस्तावना, विषय निवडीची भूमिका, संशोधनाची उदिष्टे, संशोधनाची गृहीतके, संशोधनाचे महत्व, संशोधन पद्धती, तथ्य संकलन, संशोधन आराखडा इत्यादी घटकांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण दुसरे : वंजारी समाजाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरणामध्ये वंजारी शब्दाची उत्पत्ती, वंजारा आणि वंजारी यातील फरक, पारंपरिक दंतकथा, कुळी, गोत्र, प्राचीन काळातील वंजारी समाज, वंजारी समाजाचाप्रमुख व्यवसाय, विवाह, कुटुंब पद्धती, कुलदैवत, सण उत्सव, वंजारी समाजाची युद्धकालीन परिस्थिती, भटकंती, स्थिर होण्यासाठी आलेल्या अडचणी, डोंगर दऱ्यातील वास्तवे, सामाजिक, राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक दृष्ट्र्या केलेली वाटचाल, आरक्षण इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : वारकरी संत साहित्याची पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरणामध्ये महाराष्ट्रातील धर्म, संप्रदाय, पंथ, वारकरी संप्रदायाचे वैशिष्टे, तसेच संत नामदेव, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत तुकाराम, संत गोरोबा काका, संत रामदास, संत चोखामेळा, सावता माळी, संत जनाबाई यांचे आचार, विचार इत्यादी दृष्टिकोनातून अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण चौथे : राष्ट्रसंत भगवानबाबा यांचे चरित्र व कार्ये

प्रस्तुत प्रकरणात वंजारी समाजातील आध्य व श्रेष्ठ संत भगवानबाबा यांची कौटुंबिक पार्श्वभूमी, बालपण, शिक्षण, त्यांच्यावरील प्रभाव, भगवान गडाची स्थापना, वारी परंपरा तसेच भजन, प्रवचन, कीर्तनाच्या माध्यमातून समाजात केलेली जाणीव जागृती इत्यादी घटकांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : वंजारी समाजातील इतर संत व त्यांचे कार्ये

प्रस्तुत प्रकरणामध्ये वंजारी समाजातील संत शेकुबादादा, संत भीमसिंह महाराज, संत वामनभाऊ यांची कौटुंबिक पार्श्वभूमी, बालपण, शिक्षण, त्यांच्यावरील प्रभाव, भगवान गडाची स्थापना, वारी परंपरा तसेच भजन, प्रवचन, कीर्तनाच्या माध्यमातून समाजात केलेली जाणीव जागृती इत्यादी घटकांचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे : संतांनी सुरू केलेल्या कार्याची वाटचाल व सध्यस्थिती

प्रस्तुत प्रकरणामध्ये वंजारी समाजातील संतांनी सुरू केलेल्या भक्ती परंपरा, आळंदी, पंढरपूर तीर्थ क्षेत्राच्या वाऱ्या, कीर्तन, सप्ताह, प्रवचन परंपरा, सध्यस्थितीत काळानूरूप झालेले बदल यातून साधलेले सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक उणतीचे कार्ये इत्यादी घटकांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

प्रकरण सातवे : उसंहार आणि निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणामध्ये वरील सहा प्रकरणातील संशोधनाअंती उपसंहार मांडून त्यांची थोडक्यात निष्कर्ष देण्यात येणार आहेत.

संदर्भग्रंथ

१. फड प्रकाश, महाराष्ट्रातील वंजारी समाजाचा इतिहास, हर्षवर्धन पब्लिकेशन, परळी, प्रथमावृत्ती २०१३

२. आंधळे पी.के., श्री संत शेकुबाबादादा, सुराकीर्ती प्रकाशन, नाशिक, प्रथमावृत्ती १९९९

३. मुंडे वसंत, वंजारी समाज, सविता प्रकाशन, उस्मानाबाद, प्रथमावृत्ती २०१२

४. पवार रूक्मिणी, वंजारा : लोकजीवन पद्धती, कैलास पब्लिकेशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००५

५. मुंडे परमेश्वर, उपेक्षितांचे तारणहार : लोकनेते गोपीनाथराव मुंडे, क्रिएटिव्ह प्रकाशन, नांदेड, प्रथमावृत्ती २०१७

६. चव्हाण वसंत दादासाहेब, श्री भगवानबाबांचे चरित्र, प्रथमावृत्ती, १९७९

७. मोरे दादासाहेब, विमुक्त, गुलाबराव मारोती कारले, सुरेश एजसी, पुणे, १९९४

८. यादव आनंद, उखडलेली झाडे, सुनील अनील मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९९४

९. पाटील व्ही.बी., संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन जळगाव, प्रथमावृत्ती, २०१२

१०. नाडगोडे गुरुनाथ, सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापूर, २००१

११. दराडे एस.डी., संशोधन पद्धती, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, प्रथमावृत्ती २०१३

संशोधक

युवराज भास्करराव मुंडे

मार्गदर्शक

डॉ. विठ्ठल व्यं. घुले

प्राचार्य,

राजर्षी शाहू महाविद्यालय, परभरणी